राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

*N.S.S. Programme Co-ordinator*

University of Mumbai

Tele / Fax No. : 022-22873696
website : www.nssmu.org

**National Service Scheme Cell,**
Vidyapeeth Vidyarthi Bhavan,
2nd Floor, B-Road, Churchgate,
Mumbai - 400 020.

No.NSS/ 529 /2018-2019
Date : 1st Feb, 2019

प्रति,
प्राचार्य,
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये,

विषय : राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांचे दोन दिवसीय राज्य स्तरीय अधिवेशन / कार्यशाळा सहभागाबाबत.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त महाराष्ट्रातील कार्यक्रम अधिकाऱ्यांचे दोन दिवसीय अधिवेशन दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ ते १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन शासनाचे गृह विभाग, आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग, राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियान (रुसा) संचालक राष्ट्रीय सेवा योजना, नवी दिल्ली विभागाचे माननीय अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच माननीय प्रधान सचिव (उ.व.तं.शि.), माननीय राज्य मंत्री (उ.व.तं.शि.), माननीय सचिव (उ.व.तं.शि.) यांचे शुभ हस्ते होणार असून सर्व मान्यवर कार्यक्रम अधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. सदरील अधिवेशन / कार्यशाळेस आपल्या महाविद्यालयातील एक कार्यक्रम अधिकारी सहभागी होणे अनिवार्य आहे. ज्या महाविद्यालयामधून जिल्हा समन्वयक किंवा विभागीय समन्वयकांची नेमणूक झालेली आहे त्या महाविद्यालयामधून फक्त जिल्हा समन्वयक आणि विभागीय समन्वयकच सहभागी होतील.

कार्यक्रम अधिकारी यांचा प्रवास खर्च महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमीत कार्यक्रम अनुदानातून करण्यात यावा. तसेच आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाने राबवलेल्या उपक्रमांची प्रतीकृती सादर करण्यासाठी सोबत घेऊन यावी. आपल्या महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी (पुरुष व महिला) सहभागी होणार आहेत यांची माहिती दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ दुपारी २.०० वाजेपर्यंत तात्काळ विद्यापीठाच्या कार्यालयास ई–मेल द्वारे पाठवणे आवश्यक आहे जेणेकरुन आयोजक विद्यापीठास कार्यक्रम अधिकाऱ्यांची निवास व भोजनाची व्यवस्था करणे शक्य होईल.

आपला विश्वासू

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग